आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२१ ऑगस्ट २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी तीन दिवसाच्या पोलंड आणि युक्रेन च्या दौऱ्यावर रवाना

- देशातल्या इंटरनेट वापरकर्त्यांची संख्या ९५ कोटींवर तर दूरध्वनी वापरकर्त्यांची संख्या १२० कोटींवर
- कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेत या वर्षी जूनमध्ये १९ लाख २९ हजार नवीन सदस्यांची भर
- महाराष्ट्रातून राज्यसभेसाठी भाजपाकडून धैर्यशील पाटील आणि राष्ट्रवादीकडून नितीन पाटील यांचे उमेदवारी अर्ज दाखल

**आणि**

- महाराष्ट्रात बदलापूर इथं कालच्या आंदोलनानंतर परिस्थिती वाहतूक सुरळीत सुरू असून अफवा रोखण्यासाठी काही दिवस इंटरनेट सेवा बंद राहणार

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आजपासून तीन दिवस पोलंड आणि युक्रेन च्या दौऱ्यावर रवाना झाले. त्यापूर्वी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात प्रधानमंत्र्यांनी विश्वास व्यक्त केला आहे, की पोलंड हा मध्य युरोपातला भारताचा महत्त्वाचा भागीदार असून दोन्ही देशांच्या लोकशाही आणि बहुविविधतेविषयी असलेल्या बांधिलकीमुळे परस्परांचे संबंध अधिक दृढ व्हायला मदत होते. पोलंड आणि भारताच्या राजनैतिक संबंधांना ७० वर्षे पूर्ण होत असताना प्रधानमंत्र्यांचा हा दौरा होत आहे. पोलंडची राजधानी

वा ॅर्सा इथं त्यांच स्वागत करण्यात येणार आहे. पोलंड चे प्रधानमंत्री डोनाल्ड टस्क आणि राष्ट्रपती आंद्रेज डूडा यांची भेट घेऊन ते चर्चा करणार आहेत. तसंच पोलंड मधल्या भारतीयांशी तसंच व्यापारी आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. ४५ वर्षांनंतर भारताचे प्रधानमंत्री प्रथमच पोलंडला भेट देत असून पोलंड आणि भारतातील जामनगर आणि कोल्हापूर यांच्यातले ऋणानुबंध जपणाऱ्या दोन स्मृति स्थळांना ही मोदी या दौऱ्यात भेट देणार आहेत. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी पोलंडमधल्या शरणार्थींनी भारतातल्या या दोन शहरात आसरा घेतला होता.

युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांच्या निमंत्रणावरून प्रधानमंत्री मोदी येत्या शुक्रवारी २३ तारखेला युक्रेनला जाणार असून, १९९२ नंतर प्रथमच भारतीय प्रधानमंत्री युक्रेनला भेट देणार आहेत. युक्रेनचे प्रधानमंत्री वोलोदिमीर झेलेन्स्की यांच्या बरोबर ते अनेक द्विपक्षीय मुद्दयांवर चर्चा करणार असून तिथल्या भारतीयांशी आणि विद्यार्थ्यांशीही संवाद साधणार आहे. रशिया युक्रेन दरम्यानच्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्र्यांचा हा दौरा भारतच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात आहे.

**<><><><><>**

देशातल्या इंटरनेट वापरकर्त्यांची संख्या ८८ कोटींवरुन ९५ कोटी ४० लाखांवर गेली आहे. तर ब्रॉडबँड ग्राहकांची संख्या ९२ कोटी ४० लाख झाली आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात इंटरनेट वापरकर्त्यांमध्ये ७ कोटी ३० लाख आणि ब्रॉडबँड ग्राहकांच्या संख्येत ७ कोटी ७० लाखांनी वाढ झाल्याची माहिती दूरसंवाद मंत्रालयानं दिली आहे. देशातल्या दूरध्वनी वापरकर्त्यांमध्येही ३ कोटींची वाढ

झाली असून ही संख्या १२० कोटींवर गेल्याचं भारतीय दूरसंवाद प्राधिकरणाच्या वार्षिक अहवालात नमूद करण्यात आलं आहे.

<><><><><>

दहशतवाद आणि अतिरेकी विचारांच्या प्रसारासाठी इंटरनेटचा वापर ही सध्याची गंभीर आव्हानं असून त्याकरता जगातल्या सर्व देशांनी एकत्र येण्याची गरज असल्याचं प्रतिपादन युरोपीयन संघाचे राजदूत हर्व डेल्फिन यांनी केलं आहे. दिल्लीत आज युरोपीयन संघ - भारत परिषदेला ते संबोधित करत होते. जागतिक दहशतवादविरोधी मंडळ आणि भारताच्या परराष्ट्रव्यवहार विभागातर्फे ही दोन दिवसीय परिषद आयोजित करण्यात आली आहे.

<><><><><>

चालू आर्थिक वर्षात देशात खासगी उद्योगांची गुंतवणूक गेल्या वर्षीच्या तुलनेत ५४ टक्क्यांनी वाढेल, असा भारतीय रिझर्व बँकेचा अंदाज आहे. गेल्या वर्षी ही गुंतवणूक एक लाख एकोणसाठ हजार दोनशे एकवीस कोटी होती, ती यंदा दोन लाख पंचेचाळीस हजार दोनशे बारा कोटीपर्यंत जाण्याची शक्यता रिझर्व बँकेच्या वार्षिक अहवालात व्यक्त करण्यात आली आहे. देशांतर्गत मागणीतही वाढ होत असून विशेषतः ग्रामीण भागात मागणी वाढत असल्याचं निरीक्षण अहवालात नोंदवलं आहे.

<><><><><>

EPFO, अर्थात कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेत या वर्षी जूनमध्ये १९ लाख २९ हजार नवीन सदस्यांची नोंदणी झाली आहे. गेल्या वर्षीच्या याच महिन्याच्या तुलनेत सदस्यसंख्येत ७ पूर्णांक ८६ शतांश टक्क्यांनी वाढ झाली

आहे. कामगार आणि रोजगार मंत्रालयानं आज एका पत्रकाद्वारे ही माहिती दिली. यात १८ ते २५ वयोगटातल्या सदस्यांची संख्या जास्त आहे, असंही या पत्रकात म्हटलं आहे. संघटनेच्या माहिती नुसार अंदाजे १४ लाख १५ हजार सदस्य बाहेर पडले होते आणि नंतर त्यांनी पुन्हा सदस्यत्व घेतलं.

**<><><><>**

देशभरात राज्यसभेच्या १२ जागांसाठी पोटनिवडणूक होत आहे. महाराष्ट्रातून खासदार पियुष गोयल आणि उदयनराजे भोसले लोकसभेवर निवडून गेल्यामुळे रिक्त झालेल्या दोन जागांवर पोटनिवडणूक होणार आहे. उदयनराजे भोसले यांच्या जागी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून आज नितीन पाटील यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. काल भाजपानं रायगडचे माजी आमदार धैर्यशील पाटील यांच्या नावाची घोषणा केली. या दोघांनीही आपाआपले उमेदवारी अर्ज दाखल केले. या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस असून पुढच्या महिन्याच्या ३ तारखेला मतदान होणार आहे.

**<><><><>**

रत्नागिरी जिल्ह्याच्या पर्यटनाला चालना देण्याच्या दृष्टिने विमान मार्ग अत्यंत महत्त्वाचा आहे असं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज रत्नागिरीत केलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत आज रत्नागिरी विमानतळाच्या या नवीन प्रवासी टर्मिनलचं भूमिपूजन करण्यात आलं. त्यावेळी ते बोलत होते. कोकणात पर्यटनाचा विकास करण्यासाठी रस्ते, रेल्वे, जल आणि विमान अशा चारही प्रकारची वाहतूक सुविधा असणं आवश्यक आहे. परदेशी नागरिकांसाठीही हा मार्ग अतिशय महत्त्वाचा आहे. हे लक्षात घेऊन

१०० कोटी रुपयांच्या या टर्मिनलचं भूमिपूजन आज संपन्न झाल्याची माहितीही मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी दिली.

<><><><><>

महाराष्ट्रात बदलापूर इथं दोन लहान मुलींच्या लैंगिक शोषण प्रकरणातला आरोपी अक्षय शिंदे याची पोलीस कोठडी न्यायालयानं आज २६ ऑगस्टपर्यंत वाढवली. या भागातली परिस्थिती आणि रेल्वे वाहतूक सुरळीत सुरू असून अफवा पसरू नयेत, यासाठी काही दिवस इंटरनेट सेवा बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती मध्य रेल्वेचे पोलीस उपायुक्त मनोज पाटील यांनी दिली आहे. बदलापूर आणि परिसरातल्या शाळा आज बंद आहेत. दरम्यान, काल बदलापूर रेल्वेस्थानकात रेल रोको आंदोलन करणाऱ्या ३०० जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. २८ जणांना पोलिसांनी अटक केली असून त्यापैकी २२ जणांना न्यायालयानं १४ दिवसांच्या न्यायालयीन कोठडीत पाठवलं आहे. या पार्श्वभूमीवर बदलापूर रेल्वे स्थानक परिसरात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

दरम्यान, या प्रकरणाच्या चौकशीसाठी वरिष्ठ पोलीस अधिकारी आरती सिंह यांच्या नेतृत्वात विशेष तपास पथक नेमण्यात आलं आहे. तर सरकारी वकील म्हणून उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. हा खटला फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवण्यात येणार आहे. संबंधित शाळेच्या मुख्याध्यापिका, तसंच दोन सेविकांना निलंबित करण्यात आलं आहे. तसंच एका पोलीस निरीक्षकाचीही बदली करण्यात आली आहे.

<><><><><>

महाराष्ट्रात निलंबित आयएएस प्रशिक्षणार्थी  पूजा खेडकर हिला येत्या २९ ऑगस्टपर्यंत अटक करण्यात येऊ नये, असा आदेश दिल्ली उच्च न्यायालयानं दिला

आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी २९ ऑगस्टला होईल, असा न्यायमूर्ती सुब्रमण्यम प्रसाद यांनी यावेळी नमूद केलं.

दिल्ली उच्च न्यायालयात आज झालेल्या सुनावणीवेळी यूपीएससीनं सादर केलेला जबाब आपल्याला कालच मिळाला आहे. त्यामुळे त्याला उत्तर देण्यासाठी मुदत द्यावी, अशी मागणी पूजा खेडकर हिच्या वकीलांनी केली. त्यानंतर उच्च न्यायालयानं या प्रकरणाची सुनावणी २९ ऑगस्टला होईल असे आदेश दिले.

<><><><><>

पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेतला कांस्यपदक विजेता नेमबाज स्वप्नील कुसळे याचं जिल्हा प्रशासनाच्या वतीनं आज कोल्हापुरात जल्लोषात स्वागत करण्यात आलं. महाराणी ताराराणी यांच्या पुतळ्यापासून निघालेल्या स्वागत मिरवणुकीत नागरिक मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते. शालेय विद्यार्थी, खेळाडू देखील सहभागी झाले होते.

<><><><><>

महिलांची २० षटकांची विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धा संयुक्त अरब अमीरातींमध्ये घेण्याचा निर्णय आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेनं घेतला आहे. याआधी ही स्पर्धा बांग्लादेशात होणार होती. स्पर्धेचं अधिकृत यजमानपद मात्र बांग्लादेश क्रिकेट मंडळाकडेच असेल. दुबई आणि शारजाह मध्ये ३ ते २० ऑक्टोबर या कालावधीत या स्पर्धेतले सामने खेळले जातील. आयसीसीचे प्रमुख कार्यवाह जेफ अलार्डिस यांनी एका निवेदनाद्वारे हा निर्णय कळवला आहे.

<><><><><>